नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 12/06/2023 (सोमवार) सकाळ

---

**पो.स्टे. कोंढाळी हद्दीमधील रिंगणाबोडी शिवार येथील जुगार अड्डयावर धाड**
**—: पोलीस स्टेशन कोंढाळी नागपुर ग्रामीण ची कारवाई :—**

दिनांक १२/०६/२०२३ रोजी पोलीस स्टेशन कोंढाळी येथील स्टाफ अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना पोलीस स्टेशन कोंढाळी येथील रिंगणाबोडी शिवारात काही इसम ५२ तासपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती पोलीस स्टेशन कोंढाळी येथील स्टाफ यांना प्राप्त झाले वरून सदर पथकाने रिंगणाबोडी शिवार येथे सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे— १) मंगेश मंगल पेंदाम, वय ३८ वर्ष, रा. गोंडवाना चौक नागपूर २) अखिलेश राजेंद्र सहानी, वय ३० वर्ष, रा. फ्रेंड्स कॉलनी नागपूर ३) निलेश राजेंद्र शाहु, वय ३२ वर्ष, रा. रमाई नगर नागपूर ४) स्वप्नील कृष्णराव धोटे, वय ३३ वर्ष, रा. गिट्टीखदान नागपूर ५) सुनिल भोलेश्वर जामगडे, वय ३९ वर्ष, रा. संत कबिर नगर नागपूर ६) प्रफुल रामकृष्ण गडकरी, वय ३६ वर्ष, रा. सेमिनरी हिल्स नागपूर ७) शिवानंद रामप्रकाश सिंग, वय ३० वर्ष, रा. फ्रेंड्स कॉलनी नागपूर ८) लितेश प्रकाश आत्राम, वय ३८ वर्ष, रा. फ्रेंड्स कॉलनी नागपूर ९) संजय तुर्केल, रा. नागपूर (मालक)** हे जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण ०८ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन नगदी ५९,६६०/—रू., ०३ कार, ०९ मोबाईल व दोन विदेशी दारूचे बॉटल असा एकुण किंमती अंदाजे ३९,७८,०००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे कोंढाळी येथे अप क्र. ४९७/२०२३ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार अधिनियम सहकलम ६५ (ई) म. दा. का. सहकलम १०९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधिक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग श्री. बापु रोहोम, पोलीस स्टेशन कोंढाळी येथील ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक पंकज वाघोडे, पोलीस उपनिरीक्षक सुनिल कांबडी, सहायक फौजदार भोजराज तांदुळकर, पोलीस नायक मगेश मसने, नितेश राठोड, सुनिल ठोंबरे, पोलीस शिपाई मंगेश सावरकर, गोविंद मैंद, महिला पोलीस शिपाई जया नेवारे, तृप्ती दाते, उषा शिंदे, चालक पोलीस शिपाई अनिल ढोके यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# अनैतिक मानवी वाहतुक नागपूर ग्रामीणने घेतला अपहरण केलेल्या अल्पवयीन मुलीचा शोध

फिर्यादी यांची अल्पवयीन पिडित मुलगी वय १७ वर्षे रा. कळमेश्वर हिने Instagram ID Shivam Sagar याचेशी मैत्री केली व अचानक घरून निघुन गेल्यावर फिर्यादीने पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे येवुन रिपोर्ट दिली की त्यांची मुलगी ही घरी कुणालाही न सांगता निघुन गेली. त्यांनी Instagram ID Shivam Sagar या नावाच्या मुला सोबत निघुन गेल्याचा संशय दर्शविला होता. त्यावरून पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे अप. क्र. ४४८/२०२३ कलम ३६३ भा.द.वी अन्वये पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

अनैतिक मानवी वाहतुक नागपूर ग्रामीण येथील टिम द्वारे तपास हाती घेतल्यानंतर २०२२ मध्ये परत नमुद गुन्हयाचे विश्लेषण करून मिळालेल्या माहिती वर काम करून त्यावरून आरोपीचा नविन नंबर शोधुन त्याचे विश्लेषण करून सुरू असलेला नंबर मिळवुन त्याचा कॅफ फॉर्म मिळवीला व सर्व विश्लेषणामध्ये त्याचा पत्ता दिल्ली येथे दिसुन आल्याने अनैतिक मानवी वाहतुक येथील पोलीस उप अधिक्षक राजेंद्र निकम, महिला पोलीस उपनिरीक्षक मीरा मटाले व महिला पोलीस हवालदार ज्योती वानखेडे, पोलीस हवालदार गजानंद निंबेकर, पोलीस शिपाई ऋषभ उईके यांचे पथक यांनी दिल्ली ला रवाना होवुन दिनांक ०९/०६/२०२३ रोजी आरोपी व पिडिता यांना ताब्यात घेण्यात आले. अनैतिक मानवी वाहतुक यांना सायबर सेलच्या पोलीस उपनिरीक्षक निशांत जुनोनकर, महिला पोलीस हवालदार स्नेहलता घोपे, पोलीस नायक सतीश राठौड व पोलीस शिपाई मृणाल राउत तांत्रिक मदतीने गुन्हा उघडकिस आणण्यास मदत केली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**